रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ आतापर्यंत कोणकोणत्या कलावंतानी चित्रपटांतून मुक्यांची भूमिका केलीय?

– भूमिका अनेक आहेत. पण गाजलेल्या भूमिकांचा विचार करायचा झाला तर शकुंतला(*अबोली*), निम्मी(*आकाशदीप*), अमिताभ बच्चन(*रेश्मा और शेरा*), संजीवकुमार - जयाभादुरी(*कोशिश*), जयाप्रदा (*सरगम*), शाहरूख(*कोयला*) यासारख्या काही भूमिकाच प्रामुख्याने लक्षात राहतात.

□ राज बब्बरने खलनायकाची भूमिका केलेले चित्रपट कोणते?

– *इन्साफ का तराजू*त खलनायकाच्या भूमिकेतच राज बब्बरने आपल्या रूपेरी जीवनाची सुरुवात केली. त्यानंतर *ऐतबार, कर्मयोद्धा* यासारख्या काही चित्रपटात त्याने खलनायकाची भूमिका केली.

अशोक परशुराम परब, ठाणे(पश्चिम).

□ अभिनेत्री नंदाचं संपूर्ण नाव काय? नायिका म्हणून तिचा पहिला चित्रपट कोणता?

– अभिनेत्री नंदाचं संपूर्ण नाव नंदा विनायक कर्नाटकी. *कुलदैवत* हा तिने नायिकेची भूमिका केलेला पहिला मराठी चित्रपट आणि पहिला हिंदी चित्रपट *तुफान और दिया*.

□ आर. सी. बोरालनी संगीत दिलेला पहिला चित्रपट कोणता?

– *सुबह का सितारा* हा आर. सी. ऊर्फ रायचंद बोराल यांनी संगीत दिलेला पहिला चित्रपट.

पांडुरंग ठोंबरे, रबाळे.

□ पंकज पराशरने कोणकोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केलीय?

– पंकज पराशर अभिनेते नाहीत दिग्दर्शक आहेत. त्यांनी *हिरो हीरालाल, चालबाज, हिमालय पुत्र, राजकुमार* यासारख्या काही चित्रपटांचं दिग्दर्शन केलंय.

□ सिल्क स्मिता नावाची कोणी नायिका होती काय? तिने कोणकोणत्या चित्रपटात नायिकेची, सहनायिकेची व खलनायिकेची भूमिका केली का? तिचे नायक कोण?

– होती. *सदमा*सारख्या काही हिंदी चित्रपटात ती दिसली होती, पण हिंदीपेक्षा ती दक्षिणेकडे तामिळी, तेलगू चित्रपटात अधिक लोकप्रिय होती. आज ती आपल्यात नाही. आत्महत्या करून तिने आपल्या आयुष्याचा अकाली अंत करून घेतला.

विश्वास जाधव, खेड.

□ के.सी. बोकाडिया यांचा पहिला चित्रपट कोणता? नायक-नायिका कोण?

– *प्यार झुकता नही*, नायक नायिका मिथुन चक्रवर्ती-पद्मिनी कोल्हापरे.

□ तलत महमूदने भूमिका केलेले चित्रपट कोणकोणते?

– *राजलक्ष्मी, समाप्ती, आराम, दिले नादान,*

विद्याधर कुलकर्णी, पुणे.

□ सुधीर फडके यांनी संगीत दिलेले हिंदी चित्रपट कोणते?

वीर सावरकर चित्रपटात शैलेंद्र गौड

– रुक्मिणी स्वयंवर, गोकुल, अपराधी, मालती माधव, सजनी, पहली तारीख, मुरलीवाला, गोकूल का चोर, संत जनाबाई, आगे बढो, भाभी की चुडिया, वीर सावरकर. एक गाव की कहानी, वारिस, मालिक, लालारूख, सोने की चिडीया.

□ ट्विंकल खन्नाचा पहिला चित्रपट कोणता?

– *बरसात* ट्विंकल खन्नाचा पहिला चित्रपट.

निलाक्षी पांढरपट्टे, अकलूज.

□ रविंद्र जैन यांनी संगीत दिलेले चित्रपट कोणते? त्यांना फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळालाय का?

– *चोर मचाये शोर, सौदागर, गीत गाता चल, सलाखें, तपस्या, चितचोर, फकीरा, दुल्हन वही जो पिया मन भाये, कोतवालसाब, राम भरोसे, अखियों के झरोखेसे, पती पत्नी और वो, घर की लाज, सुनयना, इन्साफ का तराजू, साजन मेरे मैं साजन की, अबोध, राम तेरी गंगा मैली, मरते दम तक, प्रतिघात, बंधन बाहों का, हीना* हे रवींद्र जैननी संगीत दिलेले ठळक चित्रपट. *राम तेरी गंगा मैली*साठी त्यांना सर्वश्रेष्ठ संगीतकाराचं फिल्मफेअर पारितोषिक मिळालं होतं.

□ सर्वात जास्त कलाकार असलेले चित्रपट कोणते? कलाकार आणि दिग्दर्शक कोण?

– १९५७चा *कितना बदल गया इन्सान* आणि १९८२चा *सत्ते पे सत्ता* हे आत्तापर्यंतचे जास्त नायक-नायिका असलेले चित्रपट. हे दोन्ही चित्रपट *सेवन ब्राईड्स फॉर सेवन ब्रदर्स* या इंग्रजी चित्रपटावर आधारलेले होते. आणि या दोन्ही चित्रपटात सात नायक आणि सात नायिका होते. *कितना बदल गया इन्सान*मध्ये अजीत कंवलजीत आय. एस. जोहर ठक्कर अनिल दत्ता, हरबन्सलाल आणि त्यांच्याबरोबर आणखी एक कोणीतरी नायक असे सात नायक होते. तर नलिनी जयवंत, रीना, सरोजा, शांती, उदयलक्ष्मी आणि त्यांच्याबरोबर अशाच दोन नायिका मिळून सात नायिका होत्या. आय. एस. जोहर या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. *सत्ते पे सत्ता*मध्ये अमिताभ बच्चन, सचिन, विकी साहू, शक्ती कपूर, पेंटल, कंवलजीत, सुधीर हे सात नायक होते. त्यांच्याबरोबर हेमामालिनी, आराधना, प्रेमा नारायण, रंजीत, मधू मल्होत्रा, आशा सचदेव आणि त्यांच्याबरोबर कोणीतरी अशीच एक नायिका अशा सात नायिका होत्या. राज एन. सिप्पी या चित्रपटाचे दिग्दर्शक होते.

क्षितीज राजे, रायगड.

□ लक्ष्मीकांत बेर्डे यांचा पहिला मराठी चित्रपट कोणता?

– *आली लहर केला कहर* हा लक्ष्मीकांत बेर्डे यांचा पहिला मराठी चित्रपट.

□ आतापर्यंत कोणकोणत्या मराठी अभिनेत्यांनी हिंदी चित्रपटात खलनायक व विनोदी भूमिका केल्यात?

– बाबूराव पेंढारकर, दीक्षित, भगवानदादा, वसंतराव पैलवान, रमेश देव, धुमाळ, मिरजकर, सदाशिव अमरापूरकर, अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, अतुल कुलकर्णी, नाना पळशीकर.

अश्विनी केळूसकर, कोल्हापूर.

□ राज कपूरने दिग्दर्शित केलेले चित्रपट कोणते?

– *आग, बरसात, आवारा, श्री ४२०, संगम, मेरा नाम जोकर, सत्यम् शिवम् सुंदरम्, बॉबी, प्रेमरोग, राम तेरी गंगा मैली.*

□ नूतनला आतापर्यंत कोणकोणत्या चित्रपटासाठी ॲवॉर्ड पुरस्कार मिळालेत?

– *सीमा, सुजाता, बंदिनी, मिलन, मैं तुलसी तेरे आंगन की, मेरी जंग.*